दै लोकमत ७ 15/9



### तत्कालीन सीईओ सहारिया यांची ३३ वर्षानंतर जिल्हा परिषदेला भेट

# राज्य निवडणूक आयुक्तांनी दिला आठवणींना उजाळा

लोकमत न्यूज नेटवर्क



राज्य निवडणूक आयुक्त सहारिया यांनी आपल्या कार्यकाळात बसविलेल्या कोनाशिलेची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी अरूण डोंगरे, सीईओ अशोक शिनगारे, मनपा आयुक्त गणेश शिंदे आदी.

**नांदेड :** राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त जे. एस. सहारिया यांनी गुरूवारी सायंकाळी नांदेड जिल्हा परिषदेला भेट देवून ३३ वर्षांच्या आठवणींना उजाळा दिला. जिल्हा परिषदेचे १३ वे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सहारिया यांनी १८ महिने पदभार सांभाळला होता. हा भूतकाळ स्मरणात ठेवून सहारियां यांनी जिल्हा परिषदेत पाऊनतास वेळ दिला.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १४ सप्टेंबर रोजी सहारिया यांनी नांदेडला भेट दिली. यावेळी त्यांनी प्रमुख अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. दिवसभराचे कार्यक्रम आटोपून सायंकाळी सहाच्या सुमारास सहारिया यांनी जिल्हा परिषदेला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा विशेष बंदोबस्तात त्यांच्या वाहनांचा ताफा जिल्हा परिषदेकडे वळविण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी अरूण डोंगरे, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने, पोलीस अधीक्षक चंद्रकिशोर मिना, मनपा आयुक्त गणेश शिंदे आदींची उपस्थिती होती.

१ नोव्हेंबर १९८२ ते १६ एप्रिल १९८४ या कार्यकाळात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जे. एस. सहारिया यांनी नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी काम केले होते. त्यावेळी जि. प. अध्यक्ष म्हणून गंगाधरराव कुंटुरकर हे होते. सहारिया यांनी आपल्या कार्यकाळात विकास कामांना गती देण्यासाठी अनेक योजना राबविल्या, शिबिरे घेतले होते. जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण झाले होते. २४ सप्टेंबर १९८३ रोजी जिल्हा परिषदेच्या इमारतीचे उद्घाटन तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झेलसिंग यांच्या हस्ते झाले होते. त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सहारिया, जि. प. अध्यक्ष गंगाधरराव कुंटुरकर व उपाध्यक्ष म्हणून श्रीराम पाटील होते. या सर्व आठवणी जागवत सहारिया यांनी त्या काळात बसविलेल्या कोनशिलेवरील नावे कौतूकाने पाहिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी शिनगारे तसेच विभागाचे प्रमुख यांनी सहारिया यांचा सत्कार केला.

दे. प्रजावाणी



### ग्रामपंचायत निवडणुकीच्या पूर्वतयारीत निरुत्साह

# निवडणूक आयुक्तांच्या झाडाझडतीने जिल्हा प्रशासन 'घायाळ'

नांदेड,दि.१४: ग्रामपंचायत निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाने अपेक्षित पूर्वतयारी केली नसल्याबद्दल राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांनी बुधवारी झालेल्या बैठकीत तीव्र नापसंती व्यक्त करीत काही अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतल्याची माहिती बाहेर पडत आहे. विचारलेल्या प्रश्नांपुढे अधिकारी निरुत्तर होत असल्यामुळे सहारिया जाम भडकले होते. पुढच्या महिन्यात मी पुन्हा येईल, त्यावेळी अशी बेशिस्त खपवून घेणार नाही, अशी तंबीही त्यांनी या बैठकीत दिल्याचे सांगण्यात येते.

महापालिका सार्वत्रिक निवडणूक व नांदेड जिल्ह्यातील दोन टप्प्यात होणाऱ्या १७५ ग्रामपंचायत निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी सहारिया हे बुधवारी नांदेडमध्ये आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवनात त्यांनी बैठक घेतली. बैठकीच्या सुरुवातीलाच त्यांनी ग्रामपंचायत निवडणुकीची माहिती देण्याची सूचना केली. त्यावेळी झालेल्या सादरीकरणात बऱ्याच त्रुट्या दिसून आल्या. सादरीकरणात निवडणुकीशी संबधित महत्वाच्या बाबींचा अंतर्भाव केला नसल्याचे दिसून आल्यामुळे सहारिया यांनी संबधित मुद्यांबाबत थेट अधिकाऱ्यांना विचारणा केली तेव्हा समाधानकारक उत्तरे मिळू शकली नाहीत.

राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकीच्या आचारसंहितेचे कार्यक्षेत्र निश्चित केले आहे. ५० टक्के पेक्षा अधिक ग्रामपंचायतीचा समावेश असलेल्या जिल्हा किंवा तालुक्यातील संपूर्ण क्षेत्रात तर त्यापेक्षा कमी टक्केवारीने निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतीसह शेजारील ग्रामपंचायतीत आचारसंहिता लागू राहणार आहे. येत्या २६ सप्टेंबर आणि ७ ऑक्टोंबर अशा दोन टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीमुळे निवडणूक नसलेल्या शेजारील किती ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात आचारसंहितेचा प्रभाव राहणार आहे, याचेही उत्तर बहुतांश उपजिल्हाधिकारी व तहसीलदारांना देता आले नाही. ग्रामपंचायतीतील प्रभागनिहाय होणाऱ्या विविध जागेसाठी मतपत्रिका कोणत्या रंगाची वापरली जाणार आहे, याची माहिती देण्यासाठी कोणीही पुढे आले नाही.



निवडणूक जाहीर झाल्यापासून आजवर पूर्वतयारीच्या कामाबद्दलही अधिकाऱ्यांमध्ये उदासीनतेचे वातावरण दिसून आल्यामुळे सहारिया चांगलेच संतापले. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील एका उपजिल्हाधिकाऱ्यांसह किनवटच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतल्याचे सांगितले जाते. ग्रामपंचायत निवडणूक म्हणजे थट्टा नाही, अशा शब्दातही त्यांनी बैठकीत समज दिली.

ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसोबतच आता सरपंचपदाची निवडणूक प्रथमच थेट जनतेतून केली जाणार आहे. त्यामुळे सरपंचपदासाठी प्रत्येक प्रभागात एक अतिरिक्त मतदान यंत्र लागणार आहे. त्याची काय तयारी केली, असा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हा अनेक अधिकारी एकमेकांच्या चेहऱ्याकडे पाहत होते. ग्रामपंचायत निवडणुकीची माहिती असणे अपेक्षित असलेल्या अनेक बाबींचा अधिकाऱ्यांनी अभ्यासच केला नसल्याचे लक्षात आल्यानंतर सहारियांनी कपाळावर हात मारला.

### पुढच्या महिन्यात पुन्हा येणार

निवडणुकीशी संबधित बैठका घेणे, आदेश जारी करणे, आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व उपाययोजना करणे, निवडणूक कार्यक्रमाच्या प्रत्येक टप्प्यावर काळजीपूर्वक लक्ष देऊन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आयोगाच्या संपर्कात राहणे, अडचण भासल्यास मार्गदर्शन मागवणे, असा अनेक टप्प्यावर प्रत्येक अधिकाऱ्यांनी स्वत: दक्ष राहणे आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना खालच्या अधिकाऱ्यांनी केवळ पुढे पाठवण्याचे काम करु नये. प्रत्येक टप्प्यावरील अधिकाऱ्यांवर त्याची अंमलबजावणी करण्याची व्यक्तीश: जबाबदारी आहे. सध्याच्या कामावर आपण समाधानी नाही. पुढील महिन्यात मी पुन्हा येणार आहे. त्यावेळी तयारीत कोणतीही कमतरता दिसली तर संबधितांवर कारवाई केली जाईल, अशा शब्दात त्यांनी बैठकीत तंबी दिल्याचे सांगण्यात येते.